**अतितात्काळ/कालमर्यादा**

क्र.पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ-अर्ज/२६/२०२३ मुंबई, दि.०४/०७/२०२३

संदर्भ:- १.या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ-अर्ज/ २६/२०२३, दि.२६/०६/२०२३
२.या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन- घबांअ-अर्ज/२६/२०२३, दि.३०/०६/२०२३

विषय:- राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँक/ वित्तीय संस्थामार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत.

******

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भाधीन आदेशान्वये घरबांधणी अग्रिम मंजुरीचे आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत. घरबांधणी अग्रिम वाटप तसेच त्याची वसुली याबाबत करावयाची कार्यवाहीच्या अनुषंगाने दि.०३/०७/२०२३ रोजी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन (VC) बैठक घेतली असुन सदर बैठकीस एकूण ७० घटक कार्यालयाचे प्रतिनिधी ऑनलाईन उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये घरबांधणी अग्रिमाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही तसेच याबाबत घटकांना असलेल्या शंका/अडचणी याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, (प्रशासन) यांनी उपस्थित घटक कार्यालयातील अधिकारी यांना अवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याबाबत बैठकीमध्ये निर्देश दिले आहेत. सोबत बैठकीचे इतिवृत्त जोडले आहे.

तरी, सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या इतिवृत्ताप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी, ही विनंती.

(निसार तांबोली)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.राज्य मुंबई यांचे कार्यालय

प्रति,

मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य. मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुबई
अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, म.राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, अर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.राज्य. मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, नवी मुंबई
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर/ नवी मुंबई/ नाशिक शहर/ ठाणे शहर/ पिंपरी चिंचवड/ नागपूर शहर/ अमरावती शहर/ पुणे शहर/ औरंगाबाद शहर/ मिरा-भाईदर-वसई-विरार
पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई
पोलीस आयुक्त, गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई

अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग,कल्याण/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण/
दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे/ उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

पोलीस अधीक्षक, रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ सातारा/ कोल्हापूर/ सोलापूर ग्रा./ नाशिक ग्रा./ धुळे/ नंदूरबार/ जळगांव/ अहमदनगर/ बीड/ उस्मानाबाद/ सांगली/ लातूर/ परभणी/ हिंगोली/ नांदेड/ जालना/ पालघर/ वर्धा/ अकोला/ यवतमाळ/ भंडारा/ गोंदिया/ नागपूर ग्रा./ गडचिरोली/ वाशिम/ चंद्रपूर/ ठाणे ग्रा./ अमरावती ग्रा./बुलडाणा/ पुणे ग्रा./औरंगाबाद ग्रा.

पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे/ नागपूर/औरंगाबाद

पोलीस अधीक्षक, लाचलुपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण व प्रशिक्षण विद्यालय, नाशिक

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर

समादेशक, राज्य राखवी पोली गट क्र.१/२/३/४/५/६/७/८/९/ १०/११/१२/१३/१४/१५/१६

प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना/ अकोला/ बाभळगांव-लातूर/ तुरची सांगली/ नानवीज दौंड/ मरोळ-मुंबई/ नागपूर/ खंडाळा

प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण, केंद्र, नागपूर/UCTC- मुंबई

समादेशक, राज्य अपत्ती प्रतीसाद दल, धुळे/ नागपूर/

उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, अमरावती/ कोल्हापूर/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/नांदेड/ पुणे

प्रत माहितीस्तव,

मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी मुंबई

**घरबांधणी अग्रिम वाटप तसेच त्याची वसुली याबाबत करावयाची कार्यवाहीच्या अनुषंगाने दि.०३/०७/२०२३ रोजी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन (VC) झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

*********

घरबांधणी अग्रिम वाटप तसेच त्याची वसुली याबाबत करावयाची कार्यवाहीच्या अनुषंगाने दि.०३/०७/२०२३ रोजी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन (VC) बैठक घेतली असुन सदर बैठकीस एकूण ७० घटक कार्यालयाचे प्रतिनिधी ऑनलाईन उपस्थित होते.

**सदर बैठकीमध्ये घरबांधणी अग्रिमाच्या अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक, (प्रशासन) यांनी घटक कार्यालयास खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.**

१. काही पोलीस अधिकारी/ अंमलदार हे त्यांची नावे दि.२६/०६/२०२३ आदेशामध्ये नमूद नसल्याने मा. पोलीस महासंचालक तसेच मंत्रालयात तक्रार करीत आहेत. सदर अधिकारी / अंमलदार यांचे घरबांधणी अग्रिमाचे अर्जाची सॉफ्टवेअरमध्ये नोंद नसल्याने त्यांना घरबांधणी अग्रिम मंजूर झालेले नाही. तरी ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे अर्ज **दि.२६/०४/२०२३ पर्यंत घरबांधणी अग्रिमाच्या सॉफ्टवेअरमध्ये भरलेले आहेत. परंतु त्यांचे नावे आदेशामध्ये समाविष्ठ नाहीत. याची खात्रीकरुन त्यांचीच माहिती या कार्यालयाच्या ईमेलद्वारे तात्काळ सादर करण्याबाबत निर्देश दिले.** जेणे करुन त्यांनाही घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याबाबतची कार्यवाही करणे या कार्यालयास शक्य होईल.

२. या कार्यालयाच्या दि.२६/०६/२०२३ आदेशाच्या अनुषंगाने घटकनिहाय घरबांधणी अग्रिम वितरीत करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सर्व घटक कार्यालयाने त्यांचे स्वतंत्र आदेश निर्गमीत करुन **संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या खात्यावर सदरची रक्कम वितरीत करणेबाबत निर्देश दिले.**

३. संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या खात्यावर सदरची रक्कम जमा करुन त्याबाबतचा **UTR नंबर घरबांधणी अग्रिमाच्या सॉफ्टवेअरमध्ये नमूद करणेबाबत निर्देश दिले.**

४. घर खरेदीबाबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे विहित मुदतीत संबंधीत अधिकारी/ अंमलदार यांच्या कडून प्राप्त करुन घेण्याची व ताब्यात ठेवण्याबाबतची जबाबदारी ही सर्वस्वी घटक प्रमुखांची राहील असे निर्देश दिले.

५. सर्व घटक प्रमुखांनी अग्रिमधारकास रक्कम वितरीत करण्यासाठी **ॲक्सेस बँकेच्या Paypro या ऑनलाईन प्रणालीचाच वापर करावा.** Paypro ची सुविधा कार्यालयास उपलब्ध नसल्यास ॲक्सीस बँकेच्या संबंधीत शाखेशी तात्काळ संपर्क साधून सदर सुविधा उपलब्ध करुन घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तोपर्यंत RTGS किंवा NEFT द्वारे रक्कम अर्जदाराच्या खाती जमा करावी. कोणत्याही परिस्थितीत अर्जदारांना धनादेशाद्वारे / धनाकर्षाद्वारे/ रोखीने रक्कम प्रदान करु नये, असे निर्देश दिले.

६. अग्रिमाची रक्कम अदा केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून मुद्दलाची वसुली त्यांच्या वेतनातून न चुकता करण्यात यावी. सदरची रक्कम **पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत म्हणजेच जुलै २०२३ च्या वेतनातुन वसूल केलेल्या अग्रिमाच्या हप्त्यांची रक्कम ५ ऑगस्ट पर्यंत पोलीस महासंचालक यांचे ॲक्सेस बँकेतील खाते मध्ये जमा करावी, आणि MSPHC या मोड्युल मध्ये त्याबाबतची त्याक्षणी नोंद घ्यावी. ज्या घटक कार्यालयाकडून ५ ऑगस्ट पर्यंत घरबांधणी अग्रिमच्या हफ्त्याची रक्कम या कार्यालयाच्या ॲक्सीस बँक खात्यावर जमा केली जाणार नाही, त्या कार्यालयाचे आहरण व संवितरण अधिकारी तसेच प्रभारी घटक प्रमुख यांनी या कार्यालयास १० ऑगस्ट रोजी हजर रहावे, असे निर्देश दिले.**

७. विलंबाने मुद्दल जमा केल्यास किंवा विहित मुदतीत जमा करुन मोड्युल मध्ये त्याबाबतची नोंद न घेतल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत घटक प्रमुखांची राहील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच सदर आदेशामधील ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना आता घरबांधणी अग्रिमची आवश्यकता नाही. त्यांनी त्यांना प्राप्त झालेली

**घरबांधणी अग्रिमाची संपूर्ण रक्कम एक महिन्याच्या व्याजासह या कार्यालयास त्वरित परत करावी, व तसे या कार्यालयास कळवावे, असे निर्देश दिले.**

८. सदर आदेशामधील पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे नाव या कार्यालयाच्या सॉफ्टवेअरमध्ये ज्या घटकात दिसून येत आहे, त्याच घटकाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्या बँक खात्यामध्ये घरबांधणी अग्रिमाची रक्कम जमा करण्यात येत आहे. ज्या घटकांनी त्यांच्या बदली झालेल्या संबंधीत अधिकारी/ अंमलदार यांचे अर्ज सॉफ्टवेअरमधून संबंधीत बदली झालेल्या घटकास पाठविण्याची कार्यवाही केलेली नाही. त्या घटकांने घरबांधणी अग्रिमाची रक्कम **पोलीस महासंचालक कार्यालयास परत न पाठविता, त्यांचे घटकाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्या खात्यात जमा झालेली रक्कम संबंधीत नविन घटक प्रमुखांच्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्या बँक खात्यामध्ये परस्पर तात्काळ जमा करावी, व त्याबाबत संबंधीत नविन घटकास अग्रिम प्राप्त झाल्याची खात्री करावी, असे निर्देश दिले.**

९. खालील नमुद घटक कार्यालयाने इतर बँकेची खाते क्रमांक दिल्याने त्यांना घरबांधणी अग्रिम वितरीत करणे शक्य झालेले नाही. सदर मंजूर झोलेले घरबांधणी अग्रिमाच्या रक्कमेस बँकेकडून अग्रिम वितरीत केल्याच्या दिनांकापासून व्याज सुरु आहे. सदरची रक्कम घटकांकडील आपुऱ्या माहितीमुळे घटक कार्यालयास पाठविणे शक्य झालेले नसल्याने त्या रक्कमेवरील व्याज संबंधीत घटक कार्यालयास भरावे लागेल, **त्यामुळे ॲक्सीस बँकमध्ये खाते उघडण्याची कार्यवाही तात्काळ पुर्ण करावी, असे निर्देश दिले.**

१. मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य. मुंबई(सस्नेह)
२.अपर पोलीस महासंचालक, अर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, मुंबई
३.पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन/
४.पोलीस अधीक्षक अंगुली मुद्रा विभाग, मुंबई
५. संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

तसेच सदर बैठकीमध्ये काही पोलीस घटकातील अधिकारी यांनी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले होते. त्याअनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांनी मुद्याच्या समोर दर्शविल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले.

| अ.क्र | मुद्दा | देण्यात आलेले निर्देश |
|---|---|---|
| १ | ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणी अग्रिम मंजूर झालेले आहे, परंतु त्याची त्यांना आत्ता आवश्यकता नसल्याने परत करावयाचे आहे. | आत्ता ज्याना घरबांधणी अग्रिम परत करावयाचे आहे, त्यांचेकडून **१ महिन्याच्या व्याजासह रक्कम घेऊन परत करावी.** |
| २ | ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणी अग्रिम मंजूर झालेले आहे, परंतु त्यांना आत्ता परत करावयाचे आहे. त्यांची रक्कम लवकर परत केल्यास त्यांना व्याज कमी द्यावे लागेल का? | ज्याना घरबांधणी अग्रिम परत करावयाचे आहे, त्यांचेकडून १ महिन्याच्या व्याजासह रक्कम घेऊन परत करावी. |
| ३ | काही पोलीस अधिकारी/ अंमलदार मयत झाले आहेत. तसेच काही बडतर्फ/निलंबत आहेत. त्यांचे घरबांधणी अग्रिमाबाबत काय करावे. | त्यांची घरबांधणी अग्रिमाची रक्कम या कार्यालयास लवकरात-लवकर परत करावी. |
| ४ | सॉफ्टवेअरमध्ये अर्ज सादर करते वेळी काही पोलीस अधिकारी/ अंमलदार यांची सेवा २० वर्ष शिल्लक होती, परंतु आत्ता कमी सेवा शिल्लक आहे. त्याअनुषंगाने वसुलीच्या हफ्त्याच्या रक्कमेमध्ये बदल होणे आवश्यक आहे. | पोलीस अधिकारी/ अमंलदार यांच्या उर्वरीत सेवाकालावधी नुसार वसुलीच्या हफ्त्याच्या रक्कमेमध्ये योग्य ती सुधारणा सॉफ्टवेअरमध्ये करण्यात येईल. |